# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२– २५६५१४३

फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in

Website : rdtenagpur.org.in


क्रमांक : तंशिस/विकाना/शै.वि/ई.बी.सी/२०१९/1599

दि. 21 MAY 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
पदवी /पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या
विभागिय कार्यालयाचे अधिनस्त
येणा–या सर्व संस्था.
नागपूर विभाग, नागपूर.

विषयः– महा–डीबीटी पोर्टल वर ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचे अर्ज मंजूर करण्यांकरिता ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाल्याबाबत.

संदर्भ :– संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे दि. २१/०५/२०१९ च्या दूरध्वनी संदेशाअन्वये.

संदर्भिय संदेशान्वये महा–डीबीटी पोर्टल वर ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचे प्रलंबित अर्ज मंजूर करण्यांकरिता ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्यांत आलेली आहे, याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** या दोन्ही योजनाचे अर्ज संस्था स्तरावर तसेच विद्यार्थ्याकडे काही त्रूटयामुळे प्रलंबित आहेत. तरी ज्या विद्यार्थ्याचे अर्ज संस्थास्तरावर , विद्यार्थ्याच्या लॉगीनवर प्रलंबित आहेत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप पर्यत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरलेला नाही अशा सर्ष विद्यार्थ्यांना संस्थानी तात्काळ सूचना देवून उपरोक्त योजनांचे अर्ज प्रथम प्राधान्याने भरुन घ्यावेत.

सदर ऑन–लाईन प्रक्रिया **दि. २१/०५/२०१९ ते दि. २५/०५/२०१९** पर्यत सुरु राहणार आहे. तरी सर्व संस्थाना या पत्राद्वारे सूचित करण्यांत येते की, त्यांनी सर्व अर्ज त्रुटयांची पूर्तता करुन महाडीबीटी पोर्टल वर विहीत मुदतीत ऑन लाईन मंजूर करावे, जेणे करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. विहित मुदतीनंतर येणा–या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही, व याकरिता संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

( डॉ.सी.एस.थोरात )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर.